NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA २.६२)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

स्थानिक चौकशी समिती सदस्यांसाठी आदर्श आचारसंहिता
समिती सदस्यांनी महाविद्यालयांची पाहणी करताना खालील बाबी पहाव्यात.

| | |
|---|---|
| १. | पूर्वीच्या समितीने घातलेल्या अटींची पूर्तता झाली की नाही याची पडताळणी करावी |
| २. | फार्ममध्ये ज्या ठिकाणी महाविद्यालयाने होकाराची उत्तरे दिली असतील तेथे त्या संदर्भातील सर्व पुरावे दर्शक कागदपत्रे तपासणे. |
| ३. | महाविद्यालयाने पूर्ण वेळ कायम प्राचार्य व कार्यभारानुसार शिक्षक नेमलेले आहेत का नाहीत ते पाहून समितीने याबाबत आपला स्वयंस्पष्ट अभिप्राय द्यावा. |
| ४. | विनाअनुदानित महाविद्यालयांच्य संदर्भात महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पगार बँकेमार्फत होतात की नाही हे बारकाईने प्रत्यक्ष (देयक पत्रके व पासबुक) पाहणे. |
| ५. | भौतिक सुविधांची पाहणी करावी. त्यामध्ये ज्या सुधारणा अपेक्षित आहेत त्या किती कालावधीत पूर्ण कराव्यात यासंदर्भात सूचना कराव्यात. उदा. बाथरुम, मैदान इ. बाबत त्यांच्या अवस्थेची नोंद करावी. |
| ६. | ग्रंथालयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रमाणात संदर्भ ग्रंथ आहेत का नाहीत याची पाहणी करावी. नवीन संदर्भ ग्रंथ खरेदीची अट नमूद करणे आवश्यक असल्यास त्या पुस्तकांच्य संख्येचा/रक्कमेचा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच नियतकालिक खरेदी करावयास सांगताना ती नियतकालिके सद्य:स्थितीत चालू आहेत का नाहीत याची खात्री करावी. तसेचे किती व कोणती नियतकालिके खरेदी करावीत याचा उल्लेख हवा. (खरेदीच्या मुळ पावत्या तपासून पहाव्यात.) |
| ७. | कामकाजाची पाहणी करताना महाविद्यालयात विविध समित्या आहेत का नाहीत याची पाहणी करणे (उदा. महाविद्यालय विकास समिती इ.) या समितीचा कार्यवृत्तांत तपासून पहावेत व त्याबाबत अहवालात स्वयंस्पष्ट अभिप्राय द्यावेत. |
| ८. | संबंधित महाविद्यालयास विद्यापीठाने परिक्षा केंद्र मंजूर केलेले असल्यास त्यासाठी आवश्यक त्या सोयी महाविद्यालयाने उपलब्ध केलेल्या आहेत किंवा नाहीत याची समितीने प्रत्यक्ष पाहणी व त्याबाबतच्या नोंदी अहवालात नमूद कराव्यात. |
| ९. | कामकाजाची पाहणी करताना सर्व कागदपत्रे/दस्तऐवज तपासून पहावेत. उदा. वार्षिक अहवाल, अंदाजपत्रक, पदांचे रोस्टर (बिंदूनामावली) व इतर महत्त्वाचे दस्त इ. बाबत अहवालात स्पष्ट अभिप्राय द्यावेत. |
| १०. | आरक्षणाच्या स्थायी समितीचे कार्य तसेच महाविद्यालय विकास समितीच्या बैठकांचे कार्यवृत्तांत तसेच लैंगिक छळ प्रतिबंधक समिती, रॅगिंग प्रतिबंधक समिती इ. बाबी तपासून घ्यावेत. |
| ११. | शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके अद्ययावत ठेवली आहेत का नाहीत हे पहावे. |
| १२. | कर्मचाऱ्यांची पी. एफ/ई. पी. एफ. फंड, एल. आय. सी. भरली आहे की नाही हे पहावे. |
| १३. | अनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयात मागासवर्गीय आरक्षण भरले आहे किंवा नाही याची तपासणी करुन त्या त्या शैक्षणिक वर्षात बिंदू नामावली तपासून घेतली आहे का नाही ते पाहणे तसेच रोस्टर वेबसाईटवर टाकले आहे का नाही हे पहावे. |
| १४. | समितीने स्थायी समितीचे झालेले कामकाज, बी. सी. सेल समितीचे कामकाज, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या जागा भरताना मागासवर्गीय आरक्षण भरले आहे किंवा नाही तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली आहे किंवा नाही हे पहावे. |
| १५. | माजी विद्यार्थी संघ व शिक्षक-पालक संघ यांच्या बैठका त्यांचे कामकाज पहावे. |
| १६. | विद्यार्थी संसदे सोबत चर्चा करावी. त्यांच्या अडीअडचणी जाणून घ्याव्यात तसेच वेळापत्रके तपासावीत |
| १७. | कायम विनाअनुदानित महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मऱ्यांना नियमाप्रमाणे वेतन मिळते का नाही ते पहावे. |
| १८. | जमा झालेली ग्रंथालय फी व क्रिडा फी त्या त्या वर्षात खर्च झाली किंवा नाही ते पहावे. |
| १९. | विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय इतर सदस्यांची समितीवर नेमणूक करु नये. |
| २०. | दिलेल्या तारखेच्या आत महाविद्यालयास भेट देऊन अहवाल सादर करावा. |

| | |
|---|---|
| २१. | सदस्यांनी महाविद्यालयास भेट दिल्यानंतर अहवाल ताबडतोब कार्यालयाकडे सादर करावा. तसेच सर्व सदस्यांची प्रवास देयके पूर्णपणे व अचूक भरुन एकत्रितपणे अहवालासोबतच सादर करावीत. |
| २२. | अंतिम अहवाल (निरिक्षणे अटी व शिफारस) महाविद्यालयाकडून टंकलेखन करुन घेऊ नये. समितीने स्वत: तयार करावा. |
| २३. | प्रथम संलग्निकरणास व नैसर्गिक विस्तारास शक्यतो एका वर्षाची शिफारस करावी. |
| २४. | समिती प्रवासासाठी कार वापरणार असेल तर सर्व सदस्यांनी एकत्रित प्रवास करणे अपेक्षित असून कार वापरण्यासाठी विद्यापीठ पूर्वपरवानगी घ्यावी. |
| २५. | समितीने निरिक्षणे व अटी स्वतंत्रपणे आणि स्वयंस्पष्ट नमूद कराव्यात. |
| २६. | निरंतर संलग्निकरणाच्या अनुषंगाने पाहणी करताना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११६ मध्ये निरंतर संलग्निकरणासाठी आवश्यक असलेल्या मुद्यानूसार पाहणी करावी. |
| २७. | व्हीजन २० - ३५ च्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीच्या संदर्भात तपासणी करावी. |
| २८. | अटी पडताळणीसाठी गेलेल्या समितीने फक्त अटी पडताळणीच करावी नव्याने अटी घालू नयेत. |
| २९. | प्रथम संलग्निकरणाचे वेळी प्राचार्य, प्राध्यापक नेमण्याची अट असेल तर सदर अटी पूर्ततेसाठी किमान तीन महिन्याच्या कालावधी द्यावा. |
| ३०. | समितीने संलग्निकरण कसे आहे पहावे. उदा. प्रथम संलग्निकरण, नैसर्गिक विस्तार, संलग्निकरण नुतनीकरण इ. |
| ३१. | बी. बी. ए. , बी. सी. ए. व बी. एस्सी. (ई. सी. एस.) अभ्यासक्रमाची पहाणी करताना विद्यापीठाने सदर अभ्यासक्रमासाठी तयार केलेल्या गाईड लाईनच्या (मार्गदर्शक तत्त्व) अनुषंगाने पाहणी करावी. |
| ३२. | पदव्युत्तर अभ्यासक्रम अध्यापन करण्यास महाविद्यालयात प्राप्त शिक्षक तसेच त्यांचा पदवी अभ्यासक्रमाचा कार्यभार तपासून पहावा. |
| ३३. | पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अध्यापनासाठी वर्गाची उपलब्धता तपासून पहावी. |
| ३४. | समितीने निरीक्षणे व त्यासंबंधीच्या अटी स्वतंत्रपणे नमूद कराव्यात. |
| | **उपरोक्त आचार संहिते व्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश, शासन निर्णयानूसार खालील बाबींची ही तपासणी करण्यात यावी.** |
| १. | महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये दिव्यांगांचा प्रवेश सुलभ आहे किंवा कसे याबाबत दिव्यांग क्षेत्रातील तज्ञाकडून लेखापरिक्षण (Audit) करुन घेण्यात आले किंवा नाही याची तपासणी करावी. |
| २. | महाविद्यालयाचे ॲक्सेस ऑडीट झाले आहे किंवा नाही याची तपासणी करावी. |
| ३. | महाविद्यालयाने स्वत:चे संकेतस्थळ (Website) व ई-मेल विकसीत केले आहे किंवा नाही याची तपासणी करावी. |
| ४. | महाविद्यालयामध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्यात आली आहे किंवा नाही याची तपासणी करावी. |
| ५. | महाविद्यालयाने मुलामुलींसाठी तसेच अपंगासाठी स्वतंत्र शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे किंवा नाही याची पाहणी करावी. |
| ६. | महाविद्यालयाने (NAAC & NBA) मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन याबाबत काय कार्यवाही केलेली आहे याबाबतचा तपशील पहावा. |
| ७. | महाविद्यालयामध्ये वसतिगृह असल्यास विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयी सुविधा आहेत का? याची तपासणी करावी. |
| ८. | अपंग विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात रॅम्पची सुविधा आहे किंवा नाही याची पहाणी करावी. |
| ९. | महाविद्यालयातील प्रवेशावेळी अपंगांना ३% व आजी/माजी सैनिकांच्या मुलांना ५% आरक्षण दिले जाते की नाही याची पाहणी करावी. |
| १०. | महाविद्यालयात कार्यात्मक व्यायामशाळा, फुटबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, टेनिस, हॅन्डबॉल इ. मैदानी खेळाकरिता मैदान व टेबल टेनिस, बॅडमिंटन या अंतगृही (Indoor Game) खेळाकरिता सुविधा आहेत का नाही याची तपासणी करावी. |
| ११. | दि. २१/०५/२०१९ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. १०(१६) नुसार UGC व AICTE च्या निकषानुसार पात्रता धारण करणारे शिक्षक असल्याशिवाय विद्यापीठातील संलग्नित विनाअनुदानित महाविद्यालयास कोर्स सुरु करण्यास मान्यता देण्यात येवू नये. मात्र ज्या कोर्सला पात्र शिक्षक मिळत नाहीत असे सिध्द केल्यास पात्रता शिथील करुन शिक्षक भरण्यास महाविद्यालयाला सवलत देण्यात यावी. |
| १२. | जेथे अनुदानित महाविद्यालये आहेत तेथे विनाअनुदानित अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र शिक्षकेतर कर्मचारी नेमले आहेत किंवा कसे याची तपासणी करावी. |